असा. क्र. २५

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२१/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, फेब्रुवारी १२, २००९/माघ २३, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ फेब्रुवारी २००९

### अधिसूचना

**मुंबई दारूबंदी कायदा, १९४९.**

क्रमांक एमआयएस. ११०८/सीआर-७/इएक्सी-३.— मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १३९ च्या पोट-कलम (१) सह पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून मुंबई दारूबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, ते असे :—

" मुंबई दारूबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा,नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८" मध्ये,—

(अ) कलम ३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात यावा :—

" जर ग्रामीण भागात २५% पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदार यांनी संबंधित अधीक्षक , राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे लेखी निवेदन देऊन गावातील मद्यविक्रीची



[ किंमत : रुपये १५.०० ]

अनुज्ञप्ती बंद करण्याची मागणी केल्यास अशा अर्जाची पडताळणी, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी करावी. सदर निवेदनातील सह्यांची अधिप्रमाणता व खरेपणाविषयी पडताळणी केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित तहसीलदार यांना सोबत जोडलेल्या नमुन्यातील मतदान पत्रिकेचा वापर करून निर्भयपणे व गुप्त पद्धतीने मतदान घेण्याचे निर्देश देतील. तद्नंतर संबंधित तहसीलदार हे मतदानाचे ठिकाण, तारीख व वेळ याबाबतची पूर्वसूचना किमान सात दिवस अगोदर जाहीर करतील. सदर मतदानासाठी अद्ययावत मतदार यादी वापरण्यात येईल. संबंधित गावातील मतदाराची मतदानाची प्रक्रिया गुप्त मतदान पद्धतीने तहसीलदार यांच्या पर्यवेक्षणाखाली अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व नायब तहसीलदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली पूर्ण करण्यात यावी. मतदानाचे वेळी निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचा प्रतिनिधी आणि मद्य अनुज्ञप्तीधारक अथवा प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याची परवानगी द्यावी. जर अशा मतदानात स्त्री मतदारांच्या किंवा एकूण मतदारांच्या ५०% मतदारांनी मद्य अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मत दिल्यास जिल्हाधिकारी यांनी सदर मद्य अनुज्ञप्ती बंद करण्याचे आदेश द्यावेत.''

(ब) कलम ५ मध्ये,—

(i) शीर्षकामधील '' अथवा कलम (४) खाली प्राप्त झालेले निवेदन '' या शब्द, कंस आणि आकड्याऐवजी '' अथवा कलम ३ (अ) आणि (४) खाली प्राप्त झालेले निवेदन,'' असे समाविष्ट करावे.

(ii) '' कलम ४ खाली नगरपरिषद अथवा महानगरपालिका वॉर्डातून प्राप्त झालेली निवेदन, '' या शब्द, कंस व आकड्यांऐवजी, '' कलम ३ (अ) आणि ४ खाली '' गाव, अथवा नगरपरिषद अथवा महानगरपालिका वॉर्डतून प्राप्त झालेले निवेदन असे समाविष्ट करावे.

(क) कलम ९ मध्ये '' महानगरपालिका/नगरपरिषदबाबत वॉर्डाचे नाव '' या शब्दांऐवजी '' गावाचे नाव अथवा महानगरपालिका/नगरपरिषदेबाबत वॉर्डाचे नाव. '' असे समाविष्ट करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. ता. गौड,**
शासनाचे सहसचिव.